व्यापार-उद्योग-कृषी-शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कटीबध्द - कोल्हापूर

संपादक : ललित गांधी

# चेंबर पत्रिका

WESMACH
Western Maharashtra Chamber of Commerce Industries, Agro & Education
Wings For Nation !

● मुंबई ● पुणे ● नाशिक ● नगर ● सातारा ● सांगली ● सोलापूर ● रायगड ● रत्नागिरी ● सिंधुदुर्ग ● कोल्हापूर

वर्ष : ८ ◆ अंक : ०३ ◆ जून २०१७ ◆ पाने : १२ ◆ मुल्य १०/- ◆ वार्षिक मुल्य १०० रूपये

## ‘रेरा’ कायद्यामुळे स्थावर बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता...






उत्तरप्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासमवेत बैठकीप्रसंगी महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी.




## १ जुलै पासून जीएसटी लागु...

# देशातील दुसऱ्या आणि राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या
# सर्वात उंच ध्वजाचे कोल्हापूर मध्ये अनावरण



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेता अक्षय कुमार, गृह राज्यमंत्री दिपक केसरकर, आमदार राजेश क्षीरसागर यांच्यासमवेत ललित गांधी



महसुल मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अभिनेता अक्षय कुमार, आमदार अमल महाडीक यांच्या समवेत ललित गांधी.

कोल्हापूर : देशाच्या वाघा बॉर्डर नंतर दुसऱ्या क्रमांकाचा आणि महाराष्ट्र राज्यातील पहिलाच ३०३ फुट उंचीच्या ध्वज स्तंभाच्या लोकार्पणासाठी कोल्हापूर येथे विशेष उपस्थित असलेले सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चित्रपट अभिनेता अक्षय कुमार, गृह राज्यमंत्री दिपक केसरकर यांचे वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत केले.

लोकार्पण सोहळ्यास महसुल तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, श्रीमंत छत्रपति शाहु महाराज, खास. संभाजीराजे छत्रपति, धनंजय महाडीक, आम. अमल महाडीक, हसन मुश्रीफ, राजेश क्षीरसागर, सुजीत मिणचेकर, सतेज पाटील, सुरेश हाळवणकर, महापौर हसिना फरास, पूणे म्हाडाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, जिल्हापरिषद अध्यक्षा शौमिका महाडीक, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, पोलिस महासंचालक सतीश माथूर, उद्योगपति संजय घोडावत, कोल्हापूर रस्ते सौंदर्यीकरण प्रकल्पाचे (KSBP) सुजय पित्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील सर्वात उंचीच्या राष्ट्रध्वजाच्या उभारणीसाठी महावीर एज्युकेशन सोसायटी व ग्लोबल मारवाडी चॅरीटेबल फाउंडेशन या संस्थातर्फे निधी देण्यात आला होता.



सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत ललित गांधी दुसऱ्या फोटोमध्ये ध्वज अनावरणासाठी जाताना माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेता अक्षय कुमार, आम. अमल महाडीक व कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी

संपादकीय

**ललित गांधी,** संपादक

# 'जीएसटी' उंबरठ्यावर तर.. 'रेरा' लागु



देशाच्या अर्थकारणाला संपुर्ण नीव दिशा देणारे अनेक बदल गेल्या तीन वर्षाच्या कार्यकाळात मोदी सरकारने केल्याचे आपण अनुभवत आहोत.

भारतासारख्या खंडप्राय देशात, एवढ्या प्रचंड लोकसंख्येचा विचार करता नोटाबंदी, आयकर कायद्यातील सुधारणा, जी.एस.टी., रेरा सारखे नवीन कायदे व हे सर्व बदल साधारण एक वर्षापेक्षाही कमी कालखंडात होऊ घातले आहेत. भारतासारख्या वर्षानुवर्षे बेशिस्त वागण्याची सवय लागलेल्या देशाला खरेतर हा ओव्हर डोस आहे.

परंतु आता हे थांबणार नाही, लागु झाले आहे, लागु होत आहे, आता याला सामोरे जावेच लागणार आहे आणि जर स्विकारावे लागणारच आहे तर तयारीसाठी उशीर कशाला?

जी.एस.टी. कर रचनेच्या या बदलाच्या टप्प्यात पहिले वर्षभर अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल, त्याची मानसिक तयारी ठेवावी लागेल, प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असताना येणाऱ्या अडचणींचे त्या त्यावेळी निराकरण करून घ्यावे लागेल.

केंद्र सरकारने व विविध राज्य सरकारांनी यासाठी जय्यत तयारी केली आहे.

व्यापारी-उद्योग जगताच्या राष्ट्रीय, राज्यस्तरीय व स्थानिक संघटना सुध्दा कंबर कसुन कामाला लागल्या आहेत.

व्यापारी-उद्योजक-सेवा पुरवठादार यांनी सुध्दा आपली जबाबदारी ओळखुन स्वतःहुन पुढाकार घेतला पाहीजे आपापल्या संस्था-संघटनांच्या माध्यमातुन माहीती मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देशाच्या नियोजनबध्द विकासासाठी, अर्थव्यवस्थेच्या सबलीकरणासाठी आणि कररचनांच्या व्यापक सुधारणेसाठी सर्वांनी हातात हात घालुन काम करणे ही काळाची गरज आहे व त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे.

शहरी भागातील स्थिति चांगली आहे, मात्र ग्रामीण भागाकडेही आपल्याला विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

आपण सर्वजण मिळुन हे शिवधनुष्य पेलण्याचा संकल्प करूया व देशविकासासाठी आपले योगदान देण्यासाठी सज्ज राहुया !

# महाराष्ट्रातील उद्योजकांना 'उत्तर प्रदेश' मध्ये गुंतवणुकीसाठी विशेष प्रोत्साहन देऊ : ना. योगी आदीत्यनाथ

## 'महाराष्ट्र चेंबर' चे उपाध्यक्ष ललित गांधी यांच्या समवेत विशेष बैठक

लखनऊ (उत्तरप्रदेश) : 'उत्तर प्रदेश' हे देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य आता विकासाच्या रस्त्यावर मार्गक्रमण करीत असुन उत्पादन, पायाभुत सुविधा, सेवा, पर्यटन, वैद्यकीय क्षेत्र आदि विविध क्षेत्रात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत, महाराष्ट्रातील उद्योजकांनी गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा त्यांना उत्तरप्रदेश सरकार विशेष प्रोत्साहन देईल असे आवाहन उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.

उत्तर प्रदेश मधील विकासाबाबत राज्याचे नुतन मुख्यमंत्री योगी आदीत्यनाथ विविध क्षेत्रातील मान्यवरांशी चर्चा करीत आहेत, त्याअंतर्गत त्यांनी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' चे उपाध्यक्ष ललित गांधी व विविध संस्थांचे पदाधिकारी यांना लखनऊ येथे बैठकीसाठी आमंत्रित केले होते.

मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीप्रसंगी त्यांनी हे आवाहन केले, तसेच विविध सामाजिक क्षेत्रात सहभागाची आवश्यकता व्यक्त केली. याप्रसंगी मा. मुख्यमंत्र्यांनी विविध योजनांचे पुस्तक ललित गांधी यांना भेट दिले.

ललित गांधी यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक विकासाची तसेच या विकासातील 'महाराष्ट्र चेंबर' च्या योगदानाचीही माहिती दिली. तसेच उत्तर प्रदेश च्या मुख्यमंत्र्यांना 'महाराष्ट्र' दौऱ्यासाठी आमंत्रण दिले. महाराष्ट्रातील उद्योजकांच्या भेटीसाठी लवकरच येऊ असे आश्वासन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले.



**उत्तरप्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बैठकीवेळी विविध योजनांचे पुस्तक ललित गांधी यांना भेट दिले. यावेळी विपीन जैन, अमृत शहा, के. एल. जैन आदि.**

याप्रसंगी उत्तर भारत व्यापारी महासंघाचे विपीन जैन, वेसमॅक चे अमृतभाई शहा, उत्तरप्रदेश महासंघाचे वर्धमानजी जैन, के. एल. जैन, माणिकजी आदि उपस्थित होते.

# महाराष्ट्र विधान मंडळात 'जीएसटी' संमत

## राज्यातील अंमलबजावणीचा मार्ग मोकळा



महाराष्ट्र राज्याने जीएसटी कायदा समंत केल्याबद्दल अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगुंटीवार यांना धन्यवाद देताना ललित गांधी सोबत राज्याचे महसुल मंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील.

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात 'जीएसटी' कायदा एकमताने संमत करण्यात येऊन, 'जीएसटी' च्या महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. २०-२१-२२ मे या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात दोन्ही सभागृहात सर्वपक्षीय मान्यवरांनी विस्तृत चर्चा करून विधेयक संमत केले.

मुख्यमंत्री नाम. देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगुंटीवार यांनी या मंजुरीसाठी सर्वांना धन्यवाद दिले.

अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगुंटीवार व भाजपचे पक्षप्रतोद ना. राज. के. पुरोहित यांच्या विशेष निमंत्रणावरून 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी एक दिवस अधिवेशनात हजेरी लावुन मुख्यमंत्री नाम. देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील, अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगुंटीवार, संसदीय कार्यमंत्री नाम. गिरीश बापट, अर्थराज्यमंत्री नाम. दिपक केसरकर आदि मान्यवरांना अभिनंदन केले. याप्रसंगी विधासभा अध्यक्ष नाम. हरभाऊ बागडे यांची विशेष भेट घेऊन 'महाराष्ट्र चेंबर' च्या कामकाजाबद्दल चर्चाही केली.

# राज्याच्या जडणघडणीत 'महाराष्ट्र चेंबर'चे महत्वपुर्ण योगदान

## विधानसभा सभापती नाम. हरीभाऊ बागडे



महाराष्ट्र विधानसभेचे सभापती नाम. हरिभाऊ बागडे यांच्याशी चर्चा करताना ललित गांधी सोबत नाम. राज के. पुरोहित.

मुंबई : महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक जडणघडणीमध्ये 'महाराष्ट्र चेंबर' ने मोलाचे योगदान दिले आहे.

दृष्टे महाराष्ट्रीयन उद्योगपती व महाराष्ट्र चेंबर चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांचा यामध्ये सिंहाचा वाटा आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे सभापती नाम. हरिभाऊ बागडे यांनी केले.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री नाम. सुधीर मुनगुंटीवार व भाजपाचे पक्षप्रतोद नाम. राज.के.पुरोहित यांनी 'जीएसटी' साठी आयोजित विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात कामकाज पाहणेसाठी व चर्चेसाठी महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी यांना आमंत्रित केले होते.

त्यावेळी ललित गांधी यांनी सभापती महोदयांची सदीच्छा भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली त्यावेळी नाम. बागडे बोलत होते. त्यांनी महाराष्ट्र चेंबरच्या अनेक जुन्या आठवणींना यानिमित्ताने उजाळा दिला.

नाम. राज के. पुरोहित यांनीही यावेळी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.



# कोल्हापूरच्या नुतन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत

कोल्हापूर : कोल्हापूरचे नुतन जिल्हाधिकारी श्री अविनाशजी सुभेदार (IAS) यांचे ललित गांधी यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले व त्यांच्या यशस्वी कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अमृतभाई शहा, राजकुमार ओसवाल, कुंदन मुथा, अमोल गणपुले, वसंत राठोड इ. मान्यवर उपस्थित होते.





महाराष्ट्र चेंबर तर्फे आयोजित 'रेरा' चर्चासत्रात उपस्थितांना मार्गदर्शन करताना 'महा-रेरा' चे चेअरपर्सन श्री. गौतम चटर्जी (IAS)

## ● 'महाराष्ट्र चेंबर' तर्फे 'रेरा' चर्चासत्राचे आयोजन ●

# रेरा कायद्यामुळे स्थावर - बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता येईल : 'महा-रेरा'चे चेअरपर्सन गौतम चटर्जी

मुंबई : स्थावर मालमत्ता नियमन कायद्यामुळे स्थावर बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता येईल. यामुळे देशी व परदेशी गुंतवणुकदारांना भारतीय स्थावर मालमत्ता क्षेत्राविषयी विश्वास निर्माण होईल असे प्रतिपादन 'महा-रेरा' चे चेअरपर्सन श्री. गौतम चटर्जी (IAS) यांनी केले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' ने मुंबई येथील चेंबर च्या कार्यालयात 'स्थावर मालमत्ता नियमन कायदा' - Real Estate Regulatory Act (RERA) चे विशेष चर्चासत्र आयोजित केले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.

ते पूढे म्हणाले की, स्थावर मालमत्ता क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिला जावा अशी मागणी अनेक वर्षापासुन होत असताना, रेरा कायदा लागू करून त्या दिशेने सरकारने पावले टाकण्यास सुरूवात केली आहे. या कायद्यात एकुण ९२ कलमे आहेत. हा कायदा लागु झाल्याने भारतीय स्थावर मालमत्ता क्षेत्राच्या कार्यपध्दतीत अमुलाग्र बदल झाले आहेत. किमान ५०० चौ.मी. किंवा ८ सदनिका असणाऱ्या प्रकल्पाला हा कायदा लागू होणार आहे. या कायद्या अंतर्गत ग्राहकांकडून विकासकाने घेतलेल्या रकमेतील ७०% रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा करने विकासकाला बंधनकारक आहे. त्यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात केलेले विश्लेषन आणि अतिरीक्त संदर्भ उपस्थितांसाठी अतिशय महत्वपूर्ण होते.

यावेळी चेंबर चे अध्यक्ष शंतनु भडकमकर म्हणाले की, पूर्वी घरे विकत घेतलेल्या ग्राहकांनाही रेरा कायद्यामुळे संरक्षण मिळणार आहे. या कायद्यांतर्गत कार्यरत होणाऱ्या नियामकाला सद्या सुरू असलेले गृह प्रकल्प वेळेत कसे पूर्ण होतील, जेणेकरून घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळेल याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. रेरा कायद्यामुळे घरांच्या किमती स्थिर राहतील, मागणी वाढेल व ग्राहकांना स्थावर मालमत्ता क्षेत्राबद्दल विश्वास वाटु लागेल.

चर्चासत्राच्या सुरूवातीला चेंबर चे उपाध्यक्ष ललित गांधी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून रेरा कायद्याची प्रक्रिया समजुन घेण्यासाठी या विशेष चर्चा सत्राचे आयोजन केल्याचे सांगितले. ते म्हणाले की, केंद्र सरकारने बनविलेल्या 'रिअल इस्टेट' क्षेत्राच्या नियमनासाठीच्या कायद्याची अंमलबजावणी देशात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने सुरू केली आहे. १ मे २०१७ पासुन लागु झालेल्या या कायद्यानंतर बांधकाम क्षेत्रात नव्हे तर एकुण 'रिअल इस्टेट' क्षेत्रावर दुरगामी परिणाम होणार आहेत.




'रेरा' चर्चासत्रात 'महा-रेरा' चे चेअरपर्सन श्री. गौतम चटर्जी यांचा सत्कार करताना उपस्थित चेंबर चे ललित गांधी, शंतनु भडकमकर, आशिष पेडणेकर, संतोष मंडलेचा व अनिल वाघाडकर.

या चर्चासत्रामुळे 'रेरा' कायद्यातील नेमक्या महत्वाच्या तरतुदी, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना अव्यवहार्य वाटणाऱ्या तरतुदींमधील सुधारणा कशा होतील तसेच या नवीन कायद्याचा लाभ कसा होईल अशा अनेक महत्वपूर्ण बाबींवर मार्गदर्शन केले गेले. श्री. चॅटर्जी यांचा चेंबरतर्फे सत्कार करण्यात आला.

चर्चासत्राच्या शेवटी वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी आभार प्रदर्शन केले. उपाध्यक्ष ललित गांधी यांनी सुत्रसंचालन केले. या महत्वपूर्ण चर्चासत्रासाठी चेंबरचे माजी अध्यक्ष आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष अनिल वाघाडकर, अनिल लोढा, कार्यकारी सेक्रेटरी जनरल सागर नागरे, चेंबरचे सदस्य, व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# Rates of Goods and Services Under GST

The suspense of Rates of GST of various Items was unfolded by GST Council Meeting which was happened on 18/05/2017 and on 03/06/2017. The List of Such rates are available on the public domain by the official Government website www.cbec.gov.in.

Revenue Secretary, Dr. Hasmukh Adhia, has categorised the percentage of items in different rate slabs as under :

| Percentage of total items | Applicable Tax Rate slab |
|---|---|
| 7% | Exempt |
| 14% | 5% |
| 17% | 12% |
| 43% | 18% |
| 19% | 28% |

Glimpse of GST Rate Schedule for Goods is given as under for easy digests:

Various products were taxable at various rates of Tax under Existing Laws of Excise, VAT and Service Tax. By seeing the List one can conclude that the council has maintained utmost parity while deciding rates on various Products. In India we are having different culture and Different demand of products with different Consumption patterns. Since GST is Destination based consumption based Tax the rates of products will have Considerable Impact on The Revenue of States. Still the council has approved the rates of Products with Multiple rates Structure ranging from 0%,0.25%, 3% , 5%,12%,18%and 28% along with Cess above 28% percent in some Demerit goods.

However some of the things are coming with representation for change of Rate, Like the food Items Like Ata, Cereals etc if its sold under measure of Unit container and Bearing registered brand name then it will be taxed at 5% now, earlier that was not the case. Similar to Textile is brought under the ambit of 5% tax Bracket. Gold and Gold Jewelry will be under 3% Bracket slight higher that earlier rates. As per the Demand of West Bengal shoes and Apparels if it's sold at cost Below 500 then 5% and at all other prices above Rs 500 at 18%. Readymade garments again if It's Below Rs 1000 then 5% and Other all prices at 12%. Fiber Silk and Jute kept at 0%.

The cesses rates are added on products like Pan Masala, Tobacco, Cigarettes, Motor Vehicles etc. Important part note here is that rates of Cess are Ranging from 1% for small cars to 204% for Product like Gutkha. And this cess revenue will be useful for compensation to be given to all States for Five Years.

## In case of Services

The GST Council has broadly approved the GST rates for services at Nil, 5%, 12%, 18% and 28% for services including telecom, insurance, hotels and restaurants. Various Exemptions of services tax are carried forward as it is. The services which were under reverse charges are also carried forward in GST Regime.

## For Goods

**1. Nil Rate (0%) :** No tax will be imposed on items like milk, butter milk, curd, natural honey, fresh fruits and vegetables, flour, besan,, bindi, Sindoor, stamps, judicial papers, printed books, newspapers, bangles, handloom, Silk and etc.

**2. 5% Rate :** Cream, skimmed milk powder, branded paneer, frozen vegetables, coffee, tea, spices, rusk, sabudana, kerosene, coal, medicines, stent, lifeboats will attract tax of 5%., Footwear Below Rs 500, Readymade Garments below Rs. 1000/-

**3. 12% Rate,** butter, cheese, ghee, dry fruits in packaged form, animal fat, sausage, fruit juices, Bhujia, namkeen, , tooth powder, agarbatti, colouring books, picture books, umbrella, sewing machine, and cellphones will be taxable at 12%. Garments above Rs 1000/-

**4. 18% Rate:** Most of the items will fall 18% tax slab which include flavoured refined sugar, pasta, corn flakes, pastries and cakes, preserved vegetables, jams, sauces, soups, ice cream, instant food mixes, mineral water, tissues, envelopes, tampons, note books, steel products, printed circuits, camera, speakers and monitors etc.

**5. 28% Rate:** Chewing gum, molasses, chocolate not containing cocoa, waffles and wafers coated with chocolate, pan masala, aerated water, paint, deodorants, shaving creams, after shave, hair shampoo, dye, sunscreen, wallpaper, ceramic tiles, water heater, dishwasher, weighing machine, washing machine, ATM, vending machines, vacuum cleaner, shavers, hair clippers, automobiles, motorcycles, aircraft for personal use, and yachts etc., will attract a highest rate of tax i.e. 28%.

## For Services

- **Nil (0% Rate):** Most Service tax exemptions will continue in GST Regime as well such as:
- **Healthcare and Education services,**
- Transmission or distribution of electricity by an electricity transmission or distribution utility,
- **Services by government, local authority or governmental authority by way of any activity in relation to any function entrusted to a municipality under Article 243W of the Constitution,**
- Services provided by a goods transport agency, by way of transport in a goods carriage of agricultural produce etc.
- Services provided by way of pure labour contracts of construction, erection, commissioning, installation, completion, fitting out, repair, maintenance, renovation, or alteration of a civil structure or any other original works pertaining to the Beneficiary-led individual house construction / enhancement under the Housing for All (Urban) Mission/Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) etc.
- **5% Rate:** Category of services falling under the slab of 5% shall be subject to condition pertaining to availability of Cenvat credit such as transport of goods by rail/ in vessel, transport of passenger by rail (other than sleeper class)/ air (in economy class), services of goods transport agency, renting of motor cab, Selling of space for advertisement in print media etc.
- **12% Rate:** Category of services falling under the slab of 12% shall be subject to condition pertaining to availability of Cenvat credit such as transport of goods in containers by rail by any person other than Indian Railways, construction of a complex, building, civil structure or a part thereof, intended for sale to a buyer, wholly or partly provided the value of land is included in the amount charged from the service recipient [With full Input Tax Credit ("ITC") but no refund of overflow of ITC] etc.
- **18% Rate:** Category of services falling under the slab of 18% shall be subject to condition pertaining to availability of Cenvat credit such as supply of food/drinks in outdoor catering, composite supply of Works contract [With full ITC], telecoms & financial services etc. Further, it may be noted that all other services not specified elsewhere will also fall under the slab of 18% with full availability of ITC.
- **28% Rate:** Services by way of admission to entertainment events or access to amusement facilities etc., Gambling, supply of food/drinks in air-conditioned restaurant in 5-star or above rated Hotel etc., will attract highest rate of tax i.e. 28%

**- Chetan Bumb,**
Chartered Accountant, Nashik

# करदात्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी आयकर कायद्यात बदल : आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी

## ‘चेंबर ऑफ कॉमर्स’ व ‘आयकर विभागा’तर्फे विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन






**कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व आयकर विभागातर्फे आयोजित विशेष मार्गदर्शन सत्रात उपस्थित व्यापारी-उद्योजकांना मार्गदर्शन करताना आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी, व्यासपीठावर प्रदिपभाई कपाडीया, सी.ए. संजय वनभट्टे, ललित गांधी, संजय शेटे, हरिभाई पटेल.**

कोल्हापूर : कराच्या रूपाने पैसा हा शासनाकडे जात असतो आणि हाच पैसा विकासाच्या स्वरूपात लोकांकडे येतो. त्यामुळे कर चुकविण्याऐवजी कर भरणे केव्हाही सर्वांच्या हिताचे आहे असे प्रतिपादन आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी यांनी केले.

‘कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स’ आणि ‘आयकर विभागा’ तर्फे आयोजित विशेष मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, तर प्रदिपभाई कापडीया, चार्टर्ड अकौंटट संजय




**विशेष आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी यांचा सत्कार करताना ललित गांधी.**

व्हनबट्टे प्रमुख उपस्थित होते. चेंबरच्या कार्यालयातील शिवाजीराव देसाई सभागृहात हे सत्र झाले.

आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी म्हणाले, आयकर कायद्यातील कलम २८५ बीए नियम ११४ ई अन्वये लागु केलेल्या या तरतुदी बंधनकारक आहेत. यामध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. यावर्षी या बदलांमध्ये दंडाची तरतुद केलेली नाही. मात्र पुढच्या वर्षापासुन ती तरतुद केली जाणार आहे. दोन लाखांच्या वर व्यवहार करणाऱ्यांनी आता आयकर विभागाकडून कर आणि कायद्यांबाबत माहिती घेणे आवश्यक आहे. कर मोठ्या प्रमाणात जमा करण्याचे आणि करचुकवेगिरी करणाऱ्यांना शासन करण्यासाठी आयकर कायदे कडक करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाने आता सर्व व्यवहार ऑनलाईन करायला सुरूवात केली आहे. आता आयकरातुन कुणाचीही सुटका नाही. कोणालाही आपले उत्पन्न लपविता येणार नाही. आयकर विभागाकडून कर आणि कायद्याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, आयकर कायद्यात नव्याने केलेल्या तरतुदींनुसार विक्री व सेवेपोटी स्वीकारलेल्या रोख रकमेची माहिती सर्व संबंधितांना व्हावी यासाठी हे सत्र आयोजित केले आहे. कायदे, कररचना ही सुटसुटीत असावी अशी व्यापारी उद्योजकांची नेहमीची मागणी आहे. मात्र कायदे आणि कररचनेतील नव्या तरतुदी गुंतागुंतीच्या आहेत. त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना व्यापारी-उद्योजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या तरतुदी सुटसुटीत करण्याच्या दृष्टीने सरकारने लक्ष द्यावे. यासंदर्भात व्यापारी व उद्योजकांची मते जाणुन घेण्यासाठी लवकरच बैठक बोलविण्यात येणार आहे. नवा कायदा, करविषयक तरतुदींबाबत सुधारणा करण्याच्या व्यापारी-उद्योजकांच्या सुचना एकत्रित करून त्या अनुषंगाने ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’ व ‘फिक्की’ च्या माध्यमातुन सरकारकडे पाठपुरावा केला जाणार आहे. या सत्रात चार्टर्ड अकौंटट संजय व्हनबट्टे यांनी आयकर कायद्यातील बदलेल्या तरतुदींबाबत तांत्रिक स्वरूपातील मार्गदर्शन केले.

यावेळी कोल्हापूर सराफ व्यापारी संघाचे अध्यक्ष भरत ओसवाल, राजेश राठोड, प्लायवुड डीलर्स असोसिएशनचे संजयकुमार पाटील आदी उपस्थित होते. चेंबरचे मानद सचिव हरिभाई पटेल यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष संजय शेटे यांनी आभार मानले.




**आयकर मार्गदर्शन सत्रात मार्गदर्शन करताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर प्रदिपभाई कपाडीया, सी. ए. संजय वनभट्टे, संजय शेटे, हरिभाई पटेल.**







**कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व विक्रिकर विभागातर्फे आयोजित जी.एस.टी मार्गदर्शन चर्चासत्रात मार्गदर्शन करताना विक्रिकर विभागाचे जॉईंट कमिशनर विलास इंदलकर, असिस्टंट कमिशनर डॉ. अभिजित पोरे, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपिठावर चंद्रकांत केदार, नितीन बांगर, मुकुंद पन्हाळकर, सुनिल कानगुडे, संजय शेटे, चंद्रकांत जाधव, प्रकाश पोवार, श्रीकांत हेर्लेकर.**

# जीएसटी व्यापाऱ्यांसाठी सोपी करप्रणाली : जॉईंट कमिशनर विलास इंदलकर

## 'चेंबर ऑफ कॉमर्स' व 'विक्रीकर विभागा'तर्फे जीएसटी मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर : एकाच वस्तुचे अनेक कर भरणे व्यापाऱ्यांसाठी त्रासदायक होते म्हणुन जीएसटी (गुडस् सर्व्हिस टॅक्स) ही एकच करप्रणाली व्यापाऱ्यांसाठी सोपी आणि सुटसुटीत अशी आहे. ०१ जुलै २०१७ पासुन जीएसटी लागु होणार असुन, कोल्हापूरात यासाठी ८८% नोंदणी झाल्याचे विक्रीकर विभागाचे जॉईंट कमिशनर विलास इंदलकर यांनी सांगितले.

'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' व 'विक्रीकर विभाग-महाराष्ट्र शासन' यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संलग्न व्यापारी आणि औद्योगिक संघटना यांच्या सहकार्याने नवीन जीएसटी करप्रणाली संदर्भात महत्वपुर्ण मार्गदर्शन व चर्चासत्राचे, श्री शाहु स्मारक भवन येथे आयोजन केले होते त्यावेळी ते बोलत होते.




अध्यक्षस्थानी कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी होते. जीएसटी ची प्रक्रिया समजुन घेण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. त्यांनी करदात्यांना येणाऱ्या अडचणी मांडल्या अध्यक्ष गांधी म्हणाले सरकारने जीएसटी लागु करण्यासाठी दिलेला वेळ अपुरा आहे. जीएसटी ची अंमलबजावणी करत असताना विक्रीकर विभागाच्या प्रलंबित तक्रारी दुर करून नवीन कर प्रणाली अवलंबावी अशी मागणीही त्यांनी केली. विलास इंदलकर पुढे म्हणाले व्हॅट भरणाऱ्या व्यापाऱ्यांच्या कराचे रूपांतर जीएसटीमध्ये झाले आहे. जीएसटी करप्रणाली संगणकीय तंत्रज्ञानावर असल्याने त्यामध्ये सरकारी यंत्रणेचा हस्तक्षेप असणार नाही. ज्यातांत्रिक चुका आहेत त्याची पुर्ननोंदणी १ जुन पासुन सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे, असिस्टंट कमिशनर चंद्रकांत केदार यांनी जीएसटी केंद्र (सीजीएसटी) व राज्य (एसजीएसटी), आयजीएसटी (संयुक्त) असे तीन प्रकार आहेत असे सांगितले. ते म्हणाले नव्या जीएसटी करप्रणालीमुळे वेळ आणि पैसा वाचणार असुन व्यापारी व उद्योजकांनी आपल्या आस्थापनांची नोंदणी करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ते म्हणाले व्यापाऱ्यांना कर भरण्यासाठी विविध कार्यालयांशी संपर्क साधणे, प्रत्येक विभागाचे वेगवेगळे रेकॉर्ड ठेवावे लागत होते. पण जीएसटी केवळ एकच करप्रणाली राहणार असल्याने फारशी कागदपत्रांचे रेकॉर्ड ठेवण्याची गरज नाही.

विक्रिकर विभागाचे असिस्टंट कमिशनर डॉ. अभिजित पोरे यांनी जीएसटी करप्रणाली सहज सोप्या पध्दतीने उपस्थितांना समजावुन सांगितली. विक्रिकर विभागाचे असिस्टंट कमिशनर मुकुंद पन्हाळकर यांनी जीएसटी रिटर्नबाबतची सविस्तर माहिती दिली.

विक्रिकर विभागाचे डेप्युटी कमिशनर सुनिल कानगुडे, असिस्टंट कमिशन नितीन बांगर, एस.टी.पी. असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकांत हेर्लेकर, इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट चे अध्यक्ष अवधुत चिकोडी यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

चर्चासत्रास कोल्हापूर चेंबर चे उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, खजिनदार संजय पाटील, मानद सचिव शिवाजीराव पोवार आदि उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते कोल्हापूर इंजिनिअरींग असोसिएशन चे अध्यक्ष बाबासाहेब कोंडेकर, कोल्हापूर उद्यम सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत मुळे, इन्स्टिट्युट ऑफ इंडियन फौंड्रीमेन चे अध्यक्ष दिपांकर विश्वास, इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट चे अध्यक्ष अवधुत चिकोडी यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत चेंबर चे मानद सचिव धनंजय दुग्गे यांनी केले. आभार उपाध्यक्ष संजय शेटे यांनी मांडले, तर सुत्रसंचालन मानद सचिव हरिभाई पटेल यांनी केले.

चर्चासत्रास कोल्हापूर चेंबर, मॅख, स्मॅक, गोशिमा, आयआयएफ, कोल्हापूर इंजिनिअरींग असोसिएशन, उद्यम को-ऑप. सोसायटी, केमिस्ट असोसिएशन चे पदाधिकारी, जिल्ह्यातील सुमारे १५०-२०० व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना पोरे यांनी उत्तरे दिली, तसेच व्हॅट आणि जीएसटी रजिस्ट्रेशन संदर्भात व्यापाऱ्यांच्या शंकांचेही निरसन करण्यात आले.




परवाना फी वाढ रद्द संदर्भात बैठकीवेळी आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्याशी चर्चा करताना कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी उपस्थित शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, जयेश ओसवाल, संजय शेटे, हरिभाई पटेल, प्रदिपभाई कापडीया, चंद्रकांत जाधव, शिवाजीराव पोवार आदि.

# परवाना फी वाढीला कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स तसेच व्यावसायिक संघटनांचा विरोध

कोल्हापूर : महापालिकेच्यावतीने विविध व्यवसायांसाठी देण्यात येणाऱ्या परवाना फी च्या दरवाढीस कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज बरोबर विविध व्यावसायिक संघटनांचा विरोध आहे. त्यामुळे ही दरवाढ रद्द करावी अशी मागणी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स च्या शिष्टमंडळाने महापालिकचे नुतन आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, महापौर हसीना फरास व उपमहापौर अर्जुन माने यांना निवेदनही सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, परवाना फीमधून महसूल मिळवण्याचा उद्देश नसावा असे स्पष्ट करत पूर्वीप्रमाणे परवाना फी भरून घ्यावी ही फी चौरस फुटाचे निकष लावून ठरवणे चुकीचे आहे. तसेच किरकोळ, होलसेल अशी वर्गवारी करणे संघटनांना अमान्य आहे. अनेक करांमुळे व्यापार व उद्योग अडचणी आला असून अनेकजण शहराबाहेर जाऊन व्यापार करत आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हित लक्षात घेऊन व महापालिकेला योग्य उत्पन्न मिळावे या हेतूने परवाना फी आकारण्यात यावी. जुन्या दराने परवाना फी भरण्यासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी, कोणत्याही दंडाची कारवाई करण्यात येऊ नये अशी मागणी आयुक्तांकडे करण्यात आली.

परवाना फी मध्ये करण्यात आलेल्या वाढीमुळे छोट्या व्यावसायिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. महापालिकेने सुविधा देण्यासह अन्य प्रश्न सोडविण्यावर भर देण्याची गरज आहे. तरच व्यावसायिक अधिकाधिक कर देऊ शकतील. महापालिकेने करवाढ कमी करावी अशी मागणी यावेळी व्यावसायिकांनी केली.

आयुक्तांसोबत चर्चेवेळी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव जयेश ओसवाल, धनंजय दुग्गे, शिवाजीराव पोवार, हरीभाई पटेल, प्रदिपभाई कापडीया, किरकोळ दुकानदार संघाचे संदीप वीर, जयंत गोयाणी, सराफ संघाचे माणिक जैन, कुलदिप गायकवाड, अजित कोठारी, राहुल नष्टे, बबन महाजन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन चे प्रदिप व्हरांबळे यांच्यासह महापालिकचे शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत यांच्यासह व्यावसायिक उपस्थित होते. याबाबत अभ्यास करून मनपा तसेच व्यापारी यांच्यावर अन्याय होणार नाही अशा पध्दतीने निर्णय घेवु असे आश्वासन आयुक्त डॉ. चौधरी यांनी दिले.

यावेळी चेंबरेचे अध्यक्ष ललित गांधी यांच्याहस्ते कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. चौधरी यांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.




कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौर हसीना फरास व उपमहापौर अर्जुन माने यांना परवाना फी वाढ रद्द करण्याचे निवेदन देताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत संजय शेटे, धनंजय दुग्गे, बबन महाजन, अजित कोठारी आदि.

# असोचेम चे ‘डिजिटायझिंग एमएसएमइस्’ चर्चासत्र संपन्न




चर्चासत्रात मार्गदर्शन करताना ललित गांधी, व्यासपीठावर उपस्थित कुणाल सिंघल, ज्योतीप्रकाश गाडीया, रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या कार्याकारी संचालिका सुरेखा मरांडी व एमएसएमइ डेव्हलपमेंट इन्स्टीट्युट चे संचालक आर. बी. गुप्ते.

मुंबई : दि असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया (असोचेम) द्वारा ‘डिजिटायझिंग एमएसएमइस् – दि वे फॉरवर्ड’ या चर्चासत्राचे हॉटेल दि ऑर्किड, मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. क्षेत्रीय एमएसएमइला सहाय्य करणे व त्यांच्या सध्याच्या आव्हांनांवर व आधुनिकीकरणावर चर्चा करणे हा चर्चासत्राचा उद्देश होता.

‘असोचेम’चे व्यवस्थापकीय समिती सदस्य व वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी चर्चासत्रात उपस्थितांचे स्वागत करून आपले विचार मांडले.

एमएसएमइ डेव्हलपमेंट इन्स्टीट्युटचे संचालक आर.बी.गुप्ता यांचे विशेष मार्गदर्शन झाले. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या कार्यकारी संचालिका सुरेखा मरांडी यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन व नॉलेज स्टडीज् या माहितीपत्रिकेचे प्रकाशन केले. एझी इआरपी टेक्नोलोजीस प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक कुणाल सिंघल यांनी उद्योग विषयावर मार्गदर्शन केले. शॉपक्लुज व ड्रुल चे संस्थापक संदिप अगरवाल यांनीसुध्दा मार्गदर्शन केले. एमएसएमइ विकास परिषदेचे को–चेअरमन व असोचेम आणि दि रिसजेंट इंडिया लि.चे व्यवस्थापकीय संचालक ज्योतीप्रकाश गाडीया यांनी चर्चासत्राच्या अहवालातील ठळक मुद्यांचे वाचन केले.

आभार प्रर्दशन असोचेमचे सुमीत्रा नंदन श्रीवास्तव यांनी केले.

# कन्झ्युमर्स शॉपी प्रदर्शनाचे उद्घाटन

कोल्हापूर : कन्झ्युमर्स शॉपी या गृहपयोगी व गृहसजावटींच्या वस्तुंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार (IAS) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष ललित गांधी, राजामोहन पाटील, जयंत कुलकर्णी, मनोहर शर्मा, रोहिणी सुभेदार, दिपक मंडलीक, संयोजिका मिनल मोहाडीकर यांच्यासह आदि उपस्थित होते.



कन्झ्युमर्स शॉपी प्रदर्शनाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार शेजारी उपस्थित ललित गांधी, राजामोहन पाटील, मनोहर शर्मा, जयवंत कुलकर्णी, रोहिणी सुभेदार, मिनल मोहाडीकर आदि.

# ‘मिशन अॅडमिशन २०१७’ प्रदर्शनाचे उद्घाटन संपनन




मिशन अॅडमिशन २०१७ चे प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी सोबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, दिशा पाटील, टी. बालन, मकरंद देशमुख.

कोल्हापूर : पाल्याच्या शाळेत प्रवेश करण्यासाठी चांगली शाळा कोणती, शाळेची वैशिष्ठ्ये काय या गोष्टींची माहिती घेत पालकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात लोकमत ‘मिशन अॅडमिशन २०१७’ प्रदर्शनाचे डॉ. व्ही.टी.पाटील स्मृतिभवन येथे आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांच्या हस्ते झाले. यावेळी वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, डायस अॅकॅडमीच्या सीईओ दिशा पाटील, विबग्योर हायस्कुल चे मुख्याध्यापक टी. बालन, लोकमत चे वरिष्ठ सरव्यवस्थापक मकरंद देशमुख प्रमुख उपस्थित होते.

नाविण्यपूर्ण शिक्षण पध्दती, खेळातुन शिक्षण, मानसशास्त्रीय कल आदि स्टॉलच्या माध्यमातुन पालकांना योग्य निर्णय घेण्याची संधी मिळाली आहे असे प्रतिपादन डॉ. कुणाल खेमनार यांनी यावेळी केले.

पालकांनी आपल्या पाल्यांसाठी वेळ काढुन शिक्षण क्षेत्रातील नाविण्यपूर्ण अभ्यासपध्दती, योग्य शाळेची निवड, सोयी सुविधा आदिंची माहिती मिळण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरेल असे उद्गार ललित गांधी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.






पोस्ट खात्यातर्फे स्पेशल कव्हरच्या प्रकाशना वेळी मार्गदर्शन करताना प्रवर डाक अधिक्षक रमेश पाटील दुसऱ्या फोटो मध्ये पोस्टल कव्हरचे अनावरण करताना बी. के. दादाभॉय, कृष्णात पाटील, खा. संभाजीराजे, धनंजय महाडीक, छ. शाहू महाराज, हसिना फरास व रमेश पाटील.

# रेल्वेच्या विकासाचा वेग वाढावा : छ. शाहू महाराज

## कोल्हापूर रेल्वेसेवेची १२५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पोस्ट खात्यातर्फे विशेष पोस्टल कव्हरचे प्रकाशन

कोल्हापूर : रेल्वे हे सर्वसामान्यांसाठी महत्वाचे वाहतुकीचे साधन आहे. त्यामुळे रेल्वेस्थानांचा दर्जा वाढणे, स्वच्छता राखणे, रेल्वे ट्रॅकची संख्या वाढणे आवश्यक आहे. कोल्हापूर रेल्वेचा विकास वाढविण्याची गरज आहे असे मत श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी व्यक्त केले. छत्रपति शाहू महाराज टर्मिनसच्या रेल्वेसेवेची १२५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शाहू महाराजांच्या हस्ते पोस्ट खात्यातर्फे स्पेशल कव्हरचे प्रकाशन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास खा. छत्रपति संभाजीराजे, धनंजय महाडीक, महापौर हसिना फरास, पुणे मंडळ रेल्वेचे व्यवस्थापक बी. के. दादाभॉय, कृष्णात पाटील, प्रवर डाक अधिक्षक रमेश पी. पाटील, सहाय्यक डाक अधिक्षक (मुख्यालय) संजय देसाई, डाक निरीक्षक गौरव टियोटिया, मुंबई क्षेत्रीय समितीचे सदस्य शिवनाथ बियाणी, पूणे विभागीय समितीचे सदस्य समीर शेठ, कोल्हापूर स्टेशन चे सुपरिटेंडन्ट सुग्रीव मीणा उपस्थित होते.

श्रीमंत शाहू महाराज यांनी भाषणात म्हणाले, कोल्हापूर–मिरज रेल्वे मार्ग ब्रॉडगेज होऊन बरीच वर्षे झाली. त्यानंतर कोल्हापूरसाठी गाड्यांची संख्या वाढण्यापलिकडे काही झाले नाही. आता रेल्वेची काही कामे होत आहेत. पण हा वेग समाधानकारक नाही. आता विकासाचा वेग वाढला पाहिजे. येत्या काळात कोल्हापूर कोकण रेल्वेशी जोडणी आणि कऱ्हाड–कोल्हापूर–बेळगाव मार्गाचे काम सुरू होणे गरजेचे आहे. रेल्वे स्टेशनचा हेरिटेज ढाचा सांभाळून विकास व्हावा.

सदगुरू बाबा हरदेसिंहजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रेल्वे स्टेशनची स्वच्छता केल्याबद्दल संत निरंकारी चॅरीटेबल फाऊंडेशनला खासदार महाडीक यांनी प्रशस्तिपत्रक प्रदान केले. कोल्हापूरच्या स्टेशनला ऐतिहासीक पार्श्वभूमी आहे. तरीही येथे संग्रहालय का होऊ शकले नाही, असा प्रश्न पडतो. किमान कोल्हापूर रेल्वे स्थानकाचे कॉफीटेबल बुक प्रसिध्द व्हावे अशी अपेक्षा खा.संभाजीराजे यांनी यावेळी व्यक्त केली.

खासदार महाडीक म्हणाले, कोल्हापूर स्थानक हेरिटेज न राहता, हायटेक होण्याची गरज आहे. सीएटी स्टेशनच्या धर्तीवर विकासाची गरज आहे. यासाठी बीओटी, पीपीटी अशा कोणत्याही प्रकारच्या मॉडेलने काम करण्याची तयारी आहे. प्रवर डाक अधिक्षक रमेश पाटील म्हणाले की, भारतीय डाक विभागाने भारतातील समृध्द सांस्कृतिक वारसा, स्मारके, भारताचा इतिहास, महान व्यक्ति, संस्था, संस्मरणीय घटना यांच्या सन्मानार्थ नेहमीच 'स्पेशल कव्हर' चे प्रकाशन केले आहे.

देश–विदेशातील लोक 'स्पेशल कव्हर' प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहात असतात. जेणेकरून त्यांच्या संग्रहामध्ये त्याची भर व्हावी. त्यामुळे कोल्हापूर रेल्वे स्टेशनला १२५ वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने प्रदर्शित होणाऱ्या 'स्पेशल कव्हर' ला विशेष महत्व आहे जेणेकरून छत्रपति शाहुमहाराज टर्मिनस या ऐतिहासिक इमारतीचे नाव व रूप संपुर्ण जगभर पोहोचणे शक्य होणार आहे.

पुणे मंडळ रेल्वेचे व्यवस्थापक बी. के. दादाभॉय यांनी प्रास्ताविक केले. कृष्णात पाटील यांनी आभार मानले.

प्रेषक : **ललित गांधी** (अध्यक्ष)

**वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, ॲग्रो ॲन्ड एज्युकेशन (वेसमॅक)**
'बिझनेस हाउस', १६७७, ई मेन रोड,
राजारामपूरी १० वी गल्ली,
कोल्हापूर – ४१६००८ (महाराष्ट्र)

प्रति,

POSTAL : REGN. No. KLR-302/2015-2017 NAME OF POST OFFICE : RMS, KOLHAPUR

Printed, Published & Edited by Lalit Gandhi (President of WESMACH) Printed at Sakal Papers Ltd, D4, MIDC, Shiroli, Kolhapur - 416 122 and published from Business House, 1677, E, Main Road, Rajarampuri, 10th Line, Kolhapur- 416008. • Ph.: 0231-2525251, Fax: 0231-2522201 • Printer /Publisher/ Editor : Lalit Gandhi • Email : westernchamber@gmail.com

• R.N.I. REGN. No. MAHMAR/2009/36262 • PUBLICATION DATE : 8 - 9 • POSTING DATE : 10TH OF EVERY MONTH